# <u>निवेदन</u>

## <u>महानिर्मितीची लेखी परीक्षा, रविवार दि. २० जून २०१० रोजी</u>

महानिर्मिती कंपनीतर्फे कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ, वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ, रसायनशास्त्रज्ञ, कनिष्ठ प्रयोगशाळा रसायनशास्त्रज्ञ, कल्याण अधिकारी, सहाय्यक कल्याण अधिकारी, उपसुरक्षा अधिकारी **(संदर्भ : महानिर्मिती जाहिरात क्र. ०१/२०१०)** व दुय्यम अभियंता, दुय्यम अभियंता (स्थापत्य), कनिष्ठ प्रयोगशाळा रसायनशास्त्र, कनिष्ठ अग्निशमन अधिकारी, कनिष्ठ सुरक्षा अधिकारी, अग्निशामक इ. प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व अपंग **(संदर्भ : महानिर्मिती जाहिरात क्र. ०३/२०१०)** या पदांच्या लेखी परिक्षा **रविवार, दि. २० जून २०१० रोजी नाशिक** येथे घेण्यात येणार असून पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी पत्र / SMS / e-mail द्वारे कळविण्यात आलेले आहे. ज्या उमेदवारांना लेखी परिक्षेचे पत्र मिळाले नसेल त्यांना ते दि. १७/०६/२०१० महानिर्मिती कंपनीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावरुन download करता येऊ शकेल, तसेच शनिवार दि. १९/०६/२०१० रोजी सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत Duplicate लेखी परीक्षा पत्र देण्याची व्यवस्था नाशिक औ.वि.केंद्र येथे करण्यात आलेली आहे.

वरील परिक्षेकरिता ज्या उमेदवारांचे अर्ज पोस्टाच्या विलंबामुळे विहित वेळेत प्राप्त झाले नाहीत, अशा उमेदवारांचे नांव पात्र व अपात्र अशा दोन्ही याद्यांमध्ये नाहीत. अशा उमेदवारांनी खालील कागदपत्रे घेऊन शनिवार दि. १९/०६/२०१० रोजी सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत लेखी परीक्षेसाठीचे पत्र देण्याची व्यवस्था नाशिक औ.वि.केंद्र येथे करण्यात येईल.

१) मुळ अर्जाची छायांकित प्रत
२) अर्जासोबत भरलेल्या डी.डी. ची छायांकित प्रत
३) नवीन डी.डी.

कृपया याची संबंधितांनी नोंद घ्यावी.